प्रस्तावना :

मानवाच्या विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये मानवाने स्वतःच्या सुरक्षीतेसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवस्था निर्माण केलेल्या दिसून येतात, यातूनच पुढे चालून शासनाने वेगवेगळे प्रकार निर्माण झालेले दिसून येतात. जसे की, राजेशाही, सरंजामशाही, सामंतशाही, हुकूमशाही, लोकशाही, वरील सर्व प्रकारामध्ये शासनाचा लोकशाही प्रकार हा आजच्या स्थितीत जगातील बहुतांश राज्यांनी स्विकारलेला दिसून येतो. इतर सर्व शासन प्रकाराची लोकशाहीची तुलना केली असता शासन व्यवस्थेच्या केवळ या प्रकारामध्ये सामान्य नागरीकांच्या मुलभूत अधिकारांचे मोठ्या प्रमाणात सरंक्षण होत असलेले दिसून येते. तसेच नागरीकांना लोकशाही शासन व्यवस्थेमध्येच स्वतःच्या विकासाची संधी मोठ्या प्रमाणात प्राप्त होते.

आधुनिक काळात राज्याची भौगोलिक क्षमता आणि लोकसंख्या यांच्यामध्ये वाढ झाल्याने सर्वत्र अप्रत्यक्ष लोकशाहीचा किंवा प्रतिनिधिक लोशाहीचा स्वीकार केलेला आढळतो. विशिष्ट वयाचे नागरिक विशिष्ट काळासाठी आपले प्रतिनिधी निवडून देतात आणि त्यांच्यामार्फत राज्यकारभार चालवितात.

लोकशाहीमध्ये सहिष्णुता या घटकाला अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे विविध विचारांना योग्य स्थान देणे महत्त्वाचे ठरते. लोकशाहीमध्ये एकापेक्षा अनेक विषय प्रस्तूत होऊ शकतात, स्वीकारले जाऊ शकतात. प्रत्येक विचारानुसार गट स्थापण्याची संधी असल्यामुळे विविध पक्षांची निर्मितीही होऊ शकते. म्हणून कोणत्याही लोकशाहीमध्ये एकापेक्षा अधिक पक्ष आढळतात.

कोणत्याही लोकशाही देशामध्ये हुकूमशाही टाळण्यासाठी सत्ताविभाजन तत्त्वाचा पुरस्कार केला जातो. सत्ताविभाजनानुसार कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांची स्वतंत्ररीत्या नियुक्ती करून त्यांना अधिकार दिलेले असतात. सत्ताविभाजन करीत असताना कोणतीही सत्ता प्रबळ बनून हुकूमशाही बनू नये म्हणून या तीनही सत्ता परस्परांवर योग्य ते नियंत्रण राखून, लोकशाहीची जोपासना करीत असतात. कोणत्याही लोकशाही देशामध्ये राज्य कोणत्या व्यक्तीचे, गटाचे किंवा पक्षाचे नसते, तर ते कायद्याचे असते आणि लोकशाही देशांमध्ये राज्यघटना हा सर्वश्रेष्ठ कायदा असतो.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये त्रिस्तरीय शासन व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे. यामध्ये सर्वोच्च स्तरावर केंद्रसरकार, प्रांतीय स्तरावर राज्य सरकार व स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली.

भारतात संसदीय शासन प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. संसदीय शासन प्रणालीत लोकप्रतिनिधींना अधिक महत्त्व प्राप्त होते. या लोकप्रतिनिधींवर, नेतृत्वावर शासनाची यशस्विता अवलंबून असते. केंद्रीय पातळीवर लोकसभेला तर राज्यपातळीवर विधानसभेला विशेष महत्त्व आहे. जनतेने प्रत्यक्ष मतदानाने निवडून दिलेले प्रतिनिधी सभागृहात असतात. लोकसभा व विधान सभेतील सदस्यांनी केलेले कार्य जनतेसाठी व देशासाठी महत्त्वाचे ठरते.

भारतात केंद्राप्रमाणेच घटकराज्यांमध्ये कायदे मंडळाची निर्मिती केली गेली. ज्या अंतर्गत विधानसभा व विधान परिषद असे दोन सभागृह निर्माण केले गेले. सर्वच घटक राज्यांमध्ये विधान परिषद निर्माण केलेली नाही. विधानसभा या सभागृहात जनतेने प्रत्यक्ष मतदानाने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. त्यामुळेच या सभागृहास विधान परिषदेपेक्षा जास्त अधिकार आहेत. विधानसभेतील सदस्यांना जनतेशी प्रत्यक्ष नियमीत संबंध येत असतो. यामुळे विधानसभा सदस्याने केलेल्या कार्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

आजच्या स्थितीत भारतात लोकशाही व कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली असल्यामुळे राजकीय नेतृत्वाचे महत्त्व वाढीस लागलेले दिसून येते. कुठल्याही समाजाच्या त्याच प्रमाणे देशाच्या अर्थिक, सामाजिक व राजकीय विकासामध्ये तेथील राजकीय नेतृत्वाचे विशेष स्थान असते. तेथील नेतृत्व स्वतःच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या व चिंतनाच्या मदतीने राजकीय विकासाची दिशा व उद्दिष्टे निश्चित करते, ती साध्य करण्यासाठी कृती योजना तयार करते व अनुयायांच्या मदतीने तिची अंमलबजावणी करते. त्यासाठी अनेक संस्थात्मक व संघटनात्मक घटकांची मदत घेतली जाते.

नेतृत्व स्वतःच एक विशाल शक्ती प्रक्रिया असल्यामुळे राज्य व्यवस्थेच्या विविध पातळीवर तिचे कार्य चालू असते. हे कार्य करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वापासून तर स्थानिक पातळीवरील नेतृत्वापर्यंत, भिन्न मानवी समूहात नेतृत्व भरतीचे कार्य अव्याहतपणे चालू असते.

कोणतेही राज्य विकसीत होण्यासाठी व प्राप्त परिस्थितीचा सामना करण्यासाठी त्या राज्यात प्रभावी व विचारी नेतृत्व असणे आवश्यक असते. ज्या राज्यात, भागात व समाजात निर्माण झालेले नेतृत्व तशी परिस्थिती हाताळण्यासाठी सक्षम असते. त्या राज्याचा किंवा भागाचा विकास झालेला दिसून येतो. कोणत्याही राज्याच्या किंवा भागाचा किंवा समाजाच्या विकासासाठी मागासलेपणासाठी तेथील नेतृत्वास जबाबदार धरले जातो. कारण नेतृत्व साधन सामग्री व मनुष्याचे योग्य प्रकारे नियोजन करून विकास प्रक्रिया गतिमान करू शकते. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आले. त्या मागचा मुख्य उद्देश हाच की स्थानिक नेतृत्व निर्माण व्हावे व नागरिकांच्या समस्या सोडविल्या जाव्यात. आजच्या लोकशाही शासन व्यवस्थेत राजकीय नेतृत्व आणि राजकीय पक्ष यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राजकीय पक्षांच्या माध्यमातूनच नेतृत्व स्वतः एक विशिष्ट कार्यक्रम जनते समोर मांडते, निवडणूक लढवीते व सत्ता प्राप्तीचा प्रयत्न करते. म्हणजेच राजकीय पक्ष लोकशाही शासन संस्थेला संघटित स्वरुप मिळवून देण्याचे कार्य करते.

कुठल्या राज्यातील लोकाशाही प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी, तेथील नागरिकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्या देशातील जनतेने निवडूण दिलेले प्रतिनिधी हे विकासाच्या बाबतीत जागृत असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना जनतेच्या प्रश्नांची, गरजांची व त्यावरील उपयांची माहिति असणे देखील आवश्यक आहे. जर या गोष्टीची माहिति त्यास असेल तर निश्चितच तो राज्याच्या व समाजाच्या विकासात मोलाची भूमिका बजावितो. पंचायत राज व्यवस्थेमुळे अशा प्रकारचे नेतृत्व निर्माण होऊ शकते. त्यामुळेच श्री यशवंतराव

चव्हाण यांनी म्हटले होते की, पंचायत राज म्हणजे आपल्या ग्रामीण नेतृत्वाला एक महत्त्वाचे आव्हान आहे.

आजच्या समाज व्यवस्थेत राजकीय, प्रशासकीय नेतृत्वाचे महत्त्व पुर्वीपेक्षा जास्त वाढ झालेले दिसून येते. संघटनेला अथवा राजकीय पक्षाला नियोजीत ध्येयाकडे नेण्यासाठी नेत्याला नियमितपणे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे लागते. समाजातील सर्वच संघटनांना नेतृत्वाची आवश्यकता असते. आजच्या स्थितीत जगातील बहुतांश देशांनी लोकशाही व कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली आहे. परिणामी नेतृत्वाची गरज व जबाबदारी वाढलेली दिसून येते. आज अनेक राजकीय, प्रशासकीय, सामाजिक, संघटना व राजकीय पक्ष अस्तीत्वात असलेले दिसून येतात. यातील सदस्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे त्यांच्या कार्यात समन्वय साधने इ. प्रकारचे कार्य नेतृत्व करतांना दिसून येते.

यामुळे ''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' ह्या विषयाचा अभ्यास करताना नेतृत्वाचा संकल्पनेचा अभ्यास करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम या कार्यक्रमा अंतर्गत आमदारांना आपल्या कार्य क्षेत्रात विकासात्मक कार्य करण्यासाठी विशिष्ट निधी उपलब्ध करून देण्यात येतो. लोक उपयोगी लहान कामाचा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये १९८४–८५ या वित्तीय वर्षापासून राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. ए.आर. अंतूले हे असताना ह्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. सन १९९०–९१ मध्ये या कार्यक्रमाचे नाव स्थानिक विकास कार्यक्रम असे करण्यात आलेले आहे. सन १९९६–९७ पासून या कार्यक्रमाचे नाव आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम असे बदलण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत आमदारांना त्यांच्या मतदार संघात विकास कामे करण्यासाठी सुरुवातीला सरकार मार्फत ४० लाख रू प्रति वर्ष देण्यात येत असे पूढे चालून या निधीत वाढ करण्यात आली या नुसार ११९९६–९७ व १९९७–९८ ते २००१–०२ मध्ये हा निधी ४५ लाख २००२–०३ ते २००६–०७ मध्ये ८० लाख २००७–०८ ते २००९–१० मध्ये एक कोटी २०१०–११ ते २०११ ते २०११–१२ मध्ये १.५० कोटी २०१२–१३ पासून सध्यापर्यंत दोन कोटी करण्यात आलेला आहे. ज्या कामांना जिल्हा नियोजन समितीत प्राधान्य व महत्त्व मिळत नाही, किंवा जी कामे जिल्हा योजनेत घेण्यात येत नाहीत अशी लोकोपयोगी कामे या योजनेतून घेतली जातात. हा कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती व या कार्यक्रमांतर्गत कोणकोणती कामे हाती घेता येतील या बाबतचे मार्गदर्शन शासन स्तरावरून वेळोवेळी करण्यात येते. या सर्व बाबीचा सविस्तर अभ्यास संशोधन कार्य करताना करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रम या योजनेची सविस्तर कार्यक्रमा अंतर्गत येणारा निधी किती येतो? यात वेळोवेळी कोणते बदल झाले, कोणती कामे करता येतात, कोणती कामे करता येत नाहीत, कामांना दिली जाणारी मंजूरी या सर्व घटकांची माहिती घेतली जाणार आहे. तसेच प्राप्त होणारा निधी कोणत्या प्रक्रियेने प्राप्त होतो? हा निधी पुरेसा आहे का? प्राप्त झालेला निधी या नेतृत्वाकडून पूर्णपणे उपयोगात आणला

जातो का? या निधीच्या माध्यमातून जी कामे झालेली आहेत त्यामुळे मतदार संघाच्या विकासाला काही गती मिळाली का? याची माहिती ''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' ह्या विषयात संशोधन करताना संशोधक घेणार आहे.

आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रम या अंतर्गत आमदारांना मतदार संघाच्या अंतर्गत असणारी विकास कामे करण्याचा म्हणजेच त्यांना मान्यता देऊन ते कार्य करून घेण्याचा अधिकार आहे का? हे पाहिले जाणार आहे. आमदार विकास निधी अंतर्गत बदनापूर, भोकरदन, घनसावंगी–अंबड, परतूर, जालना या पाचही विधानसभा मतदार संघाचा अभ्यास केला जाणार आहे. यानुसार प्रत्येक विधानसभा मतदार संघात २००४ ते २०१४ ह्या वर्षात आलेला निधी कोणत्या घटकावर किती खर्च झालेला आहे. त्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्येक मतदार संघाची माहिती वर्तुळाकार आलेखानुसार देण्यात येणार आहे.

या कालावधीत विधानसभा सदस्यांनी कोणती कामे केली, आलेला निधी कशा प्रकारे खर्च केला, याची माहिती संशोधन कार्य करताना करण्यात येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकास निधीचा विचार केला असता शासनाने स्थानिक विकास निधी खर्च करण्यासाठी काही अटी नियम घालून दिलेले आहे. जसे ३ टक्के विकास निधी अपंगासाठी, १० टक्के विकास निधी महिला व बालकांच्या विकासासाठी, १५ टक्के विकास निधी वंचित घटकांसाठी आणि २५ टक्के विकास निधी मानव विकास निर्देशांक वाढवण्यासाठी खर्च करणे अनिवार्य आहे, जो की ८० टक्क्यापर्यंत वाढविता येतो. त्याच दृष्टिकोनातून विचार केला असता जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्यांचा विकास निधी जो आजपर्यंत काही मोजक्या विभागावरच खर्च केला जात होता व इतर विभागाला विकास कार्यासाठी कमी निधी मिळत होता. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक विभागाचा असमतोल विकास आपणास पाहवयास मिळत होता.

स्थानिक स्वराज्य संस्थेला ज्या प्रमाणे विकासनिधी खर्च करण्यासाठी ज्या प्रमाणे अटी नियम शासनाने घालून दिले तश्या प्रकारचा प्रयोग विधानसभा सदस्यांचा विकास निधी खर्च करताना करता येईल का? की ज्याद्वारे जिल्ह्याचा वेगळ्या पद्धतीने विकास वाढवण्यास मदत होईल, हे पाहण्यासाठी संशोधकाने ''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' हा विषय संशोधन कार्य करण्यासाठी निवडला आहे.

साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन कार्य हे राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास असून महाराष्ट्रातील इतर राजकीय नेत्यावर संशोधनाचे कार्य अनेक संशोधकाने केलेले आहे. अशा प्रकारच्या संशोधनाचा आढावा घेत असताना असे निदर्शनास आले आहे.

१. जेम्स बर्न्स (१९७८) – यांनी आपल्या इंग्रजी संदर्भ ग्रंथात नेतृत्वाचा उदय, विकास तत्वज्ञानात्मक नेतृत्व, नेतृत्व निर्मितीचे सामाजिक स्त्रोत, सुधारणावादी नेतृत्व, क्रांतीकारी नेतृत्व, लोकमत आणि नेतृत्व, गटवादी नेतृत्व, पक्षीय नेतृत्व, विधीमंडळीय नेतृत्व, नेतृत्वाचे सिद्धांत, नेतृत्वाचे प्रत्यक्ष कार्ये नेतृत्वाबाबत अशा अनेक गोष्टींचा उहापोह करण्यात आलेला आहे.

२. खेकाळे ना.श. (१९९९) – यांनी राजकीय नेतृत्व (Political Leadership) या पुस्तकात राजकीय नेतृत्वाचा भारतामधील विकास, नेतृत्वाची संकल्पना, नेतृत्वाचे भिन्न दृष्टीकोन, नेतृत्वाची भूमिका व कार्य, नेतृत्वाचे सामाजिक स्त्रोत, नेतृत्वाचे प्रकार, नेतृत्वाचे बदलते स्वरुप याचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्राच्या अंदोलनातील योगदान, विधायक संसदपटू म्हणून केलेले कार्य, कामगार चळवळीतील योगदान यांचा आढावा घेतला आहे.

३. सावंत उत्तम (२०००) – यांनी शंकरराव चव्हाण जीवन व कार्य या विषयावर संशोधन केले आहे. या अभ्यासात शंकरराव चव्हाण यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्याचा आढावा घेतला आहे. यामध्ये त्यांनी शंकरराव चव्हाण यांच्या जीवन व कार्याचा वर्णनात्मक पद्धतीने आढावा घेतला असून शंकरराव चव्हाण यांचे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील योगदानाचा विश्लेषणात्मक आढावा घेतला आहे.

४. देवरे आर.ए. (२००२) – यांनी 'यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे. आपल्या अभ्यासात त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक साहित्य व कला या क्षेत्रातील कामगिरीचा मागोवा घेतला आहे. या प्रबंधात त्यांनी यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्रातील तसेच राष्ट्रीय राजकारणात भुमिका व कार्य यांचे विश्लेषण केले आहे. तसेच त्यांच्या वैचारिक भुमिकेचा आढावा घेतला आहे.

५. विलास आघाव (२००५) – यांनी आपल्या शोध प्रबंधात 'परभणी जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचा राजकारणातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास' या विषयाचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांनी परभणी जिल्ह्याची परिचिर्चात्मक अध्ययन, शेतकरी संघटना व परभणी जिल्हा, शेतकरी संघटनेचा विविध क्षेत्रावर झालेला प्रभाव व परिणाम इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

६. पंजाब चव्हाण (२००६) – यांनी आपल्या शोध प्रबंधात 'स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला नेतृत्वाचा राज्यशास्त्रीय अभ्यास' या शोध प्रबंधामध्ये त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था : उगम आणि विकास, नांदे जिल्हा एक दृष्टिक्षेप, नांदेड जिल्ह्यातील महिला नेतृत्वाची स्थिती, महिला

नेतृत्वाचे विकासातील योगदान, नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला नेतृत्व या घटकांचे अध्ययन केले आहे.

७. सरवटे दिलीप (२००७) – यांनी आपल्या संदर्भ ग्रंथामध्ये नेतृत्वाचे विविध प्रकार, राजकीय नेतृत्व, सामाजिक नेतृत्व, चळवळ प्रधान नेतृत्व, प्रशासकीय नेतृत्व, औद्योगिक नेतृत्व, न्यायालयीन नेतृत्व, सनदी नेतृत्व, ग्रामीन व शहरी नेतृत्व, नेतृत्वाचे गुणवत्ता मॉडेल, नेतृत्वाच्या वाटेवरील प्रलोभने, नेतृत्व शिक्षण, नतृत्वाचे कार्यपद्धती, नेतृत्वाचे आवश्यक गुण, आदर्श नेतृत्व आणि नेतृत्वाचे सरवटे मॉडेल प्रमुख घटकाचा अभ्यास सरवटे यांनी आपल्या ग्रंथात केलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

मराठवाडा मुक्ती संग्रामानंतर औरंगाबाद मध्ये एक तालुका म्हणून जालना ओळखला जाऊ लागला होता पूर्वी जालना हा औरंगाबादच्या पूर्वीकडील तालुका म्हणून घोषीत करण्यात आला. औरंगाबाद जिल्ह्यातील जालना, भोकरदन, जाफ्राबाद व अंबड हे तालुके नवीन जालना जिल्ह्यामध्ये सामाविष्ट करण्यात आले. तसेच शेजारील परभणी जिल्ह्यातील परतूर तालुका हा नवीन जालना जिल्हाला जोडण्यात आला. जालना जिल्ह्यात सुरुवातीला ५ तालुक्याचा समावेश करण्यात आला होता. पुढे १५ ऑगस्ट १९९२ रोजी तालुक्याची पुनर्रचना करण्यात येऊन बदनापूर, मंठा, घनसावंगी या तीन तालूक्याची निर्मिती करण्यात आली. या सर्व तालुक्यामध्ये सध्या घनसावंगी, बदनापूर, जालना, भोकरदन, परतूर हे पाच विधानसभा मतदार संघ आहे. या मधील विधानसभा सदस्य असून या प्रत्येकांना आपापल्या विधानसभा मतदार संघामध्ये विकासाच्या दृष्टीने नेमकी कोणकोणती विकासात्मक कार्ये केली हे पाहण्यासाठी संशोधकाने ''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' हा विषय संशोधन कार्यासाठी निवडला आहे.

राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण किंवा सत्तेचे वाटप हा लोकशाहीचा पाया आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोणातून भारतामध्ये मध्यवर्ती सत्ता (केंद्र सरकार) प्रांतीय सत्ता (राज्य सरकार) आणि स्थानिक स्वराज्य संस्था असे तीन विभाग निर्माण करण्यात आलेले आहेत.

वरील तीनही विभाग परस्परांशी अविभाज्यपणे जोडले गेलेले आहेत. या माध्यमातून समाजात एका नवीन नेतृत्वाची निर्मिती होणार होती, हे नेतृत्व जनतेमधून निर्माण होणार त्यामुळे जनतेला या नेतृत्वाकडून कार्याच्या बाबतीत अनेक अपेक्षा होत्या. त्यामुळे निर्माण झालेल्या नवीन नेतृत्वाने कोणते कार्य केले किंवा जनतेच्या अपेक्षा कितपत पूर्ण केल्या हे अभ्यासण्यासाठी संशोधकाने हा विषय निवडलेला आहे.

राजकीय नेतृत्वास अनेक प्रकारचे कार्य पार पाडावी लागतात. सद्यस्थितीला अनेक देशांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. तसेच लोकशाही सोबतच कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली आहे. त्यामुळे राजकीय नेतृत्वाचे कार्य वृद्धिंगत झालेले आहे. समूहाला मार्गदर्शन करणे, विशिष्ट ध्येय जनते समारे ठेवणे, नागरिकांना एकत्रित ठेवणे, योग्य प्रसंगी योग्य निर्णय घेणे, नागरिकांचे मनोबल उंचावणे, ध्येय प्राप्तीमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी निवारणे इत्यादी स्वरुपाची कार्य राजकीय नेतृत्वास करावी लागतात. राजकीय नेतृत्वात वरील स्वरुपाचे कार्य करावी लागत असल्यामुळे आधुनिक राज्य व्यवस्थेत राजकीय नेतृत्वाचे महत्त्व वाढलेले दिसून येते. मात्र अशा प्रकारचे कार्य खऱ्या अर्थाने राजकीय नेतृत्व पार पाडीत आहेत का? या बाबीचा शोध घेण्याचा दृष्टीकोनातून सदरील अभ्यास विषयाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे :

१. जालना जिल्ह्यातील लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणे.
२. जालना जिल्ह्यातील लोकशाही प्रक्रियेत विधानसभेतील नेतृत्त्वास मिळालेल्या विकास निधीचा किती प्रमाणात वार होतो, याचा अभ्यास करणे.
३. लोकशाही प्रक्रियेत विधानसभेतील राजकीय नेतृत्वास नेतृत्वास विकास कामासाठी विकासनिधी प्राप्त होण्याची प्रक्रिया अभ्यासणे.
४. लोकशाही प्रक्रियेत जालना जिल्ह्यातील विधानसभा नेतृत्त्वामुळे स्थानिक पातळीवर विकास घडवून आला आहे का? याचा अभ्यास करणे.
५. लोकशाही प्रक्रियेत जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्यांच्या विकास कामाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

प्रस्तूत संशोधन अभ्यासासाठी विषयाला अनुसरून पुढील गृहीतकृत्य निश्चित करण्यात आले आहे.

१. मतदार संघातील विकासात्मक कार्यामध्ये राजकीय नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका आहे.
२. विधानसभेतील नेतृत्वाने केलेल्या विकासात्मक कार्यामुळे मतदार संघाच्या विकासाला गती मिळालेली दिसते.
३. विधान सभेतील नेतृत्वास विकास कामासाठी प्राप्त होणारा विकास निधी हा सहज उपलब्ध होत नाही.
४. जालना जिल्ह्यातील विधानसभा नेतृत्वाचा विकासात्मक दृष्टिकोण सारखा दिसून येत नाही.

५. जालना जिल्ह्यातील मतदारसंघामधील विकासकार्यामध्ये असमतोलपणा आहे.
६. विधानसभेतील नेतृत्वास विकास कामासाठी प्राप्त होणारा विकासनिधी अपुरा असलेला जाणवतो.
७. विधानसभेतील नेतृत्वास मिळालेल्या निधीचा पूर्णपणे वापर केला जात असल्याचे दिसते.

संशोधन पद्धती :

''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' या विषयाच्या अभ्यासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात येईल. प्रस्तूत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी लोक प्रतिनिधिच्या मुलाखती, संबंधीत परिक्षेत्रातील नागरिकांशी चर्चा, विविध शासकीय कार्यालयातील प्राप्त माहितीचे अध्ययन या संशोधन कार्यामध्ये दिले जाणार आहे. तसेच नागरिकांच्या मुलाखती घेण्यासाठी नमुना निवड करण्यात आली. नमुना निवड करण्यासाठी संभाव्यता नमुना पद्धती अंतर्गत साधा यादृश्चिक नमुना पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. यानुसार अनियमित अंकण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये अंतर्गत टक्केवारी, सरासरी निर्देशांक वर्तुळाकार आलेख इत्यादीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

प्रस्तूत संकलनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यांचा सविस्तर उल्लेख पूढील प्रमाणे करण्यात आला आहे.

प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोतातंर्गत विधानसभा सदस्यांकडून प्रत्यक्ष मुलाखतीच्या साह्याने माहिती संकलीत केली जाणार आहे. प्राप्त माहितीनुसार सदरील सदस्याशी चर्चा करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा (२००४ ते २०१४) मतदार संघ असून त्यातून एकूण पाच विधानसभा सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. या सर्व कालखंडातील निवड करण्यात येणार आहे. या सर्व कालखंडातील निर्वाचीत आमदारांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती संकलीत केली जाणार आहे. तसेच शासनाने प्रकाशित केलेले दस्ताऐवज व अहवाल, विधिमंडळातील भाषणे, एम.फिल., पिएच.डी., मेजर रिसर्च प्रोजेक्ट, मायनर रिसर्च प्रोजेक्ट, प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध इत्यादीचा प्राथमिक स्त्रोतामध्ये उपयोग केला जाणार आहे.

नमुना निवड :

प्रत्येक विधानसभा मतदार संघातील प्रमुख सात कामाची निवड करण्यात येणार आहे. ही निवड कामावर झालेला खर्च हा निष्कर्ष महत्त्वाचा मानून केला जाणार आहे. एकूण निधी पैकी अर्ध्यापेक्षा जास्त नीधी खर्च झालेल्या कामाची निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक झालेल्या कामाच्या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांची सूची करण्यात येणार आहे. प्रत्येक होणाऱ्या कामाच्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांची सूची. यातील पहिले व शेवटचे घर वगळता क्रमांक २ मध्यभागातील घर व शेटून दुसरे घर यांची नमुना म्हणून निवड करण्यात येणार आहे. त्या घरातील एका सदस्याशी चर्चा करण्यात येणार आहे. या प्रकारे ७ x ३ नुसार प्रत्येक मतदार संघात २१ लाभार्थी तसेच ज्या भागात काम झालेले नाही अशा भागातील २१ लाभार्थी व्यक्तीशी चर्चा करण्यात येणार आहे. त्याची निवड ही वरील पद्धतीनुसार केली जाणार आहे. या प्रमाणे २१ x २१ = ४२, ४२ x ५ = २२० एका कालावधीत २२० नागरीक व दुसऱ्या कालावधीत २२० नागरीक म्हणजेच एकूण ४४० नागरीकांकडून चर्चेद्वारे माहिती संकलीत करण्यात येणार आहे. ज्या गावात एकही काम करण्यात आले नाही अशा ५ गावांची निवड प्रत्येक विधानसभा मतदार संघातून करणार आहे. ही निवड सर्वात कमी मतदार संख्या असलेलया गावांची करण्यात येणार आहे. एकूण ५ मतदार संघातून ५० नागरीक निवडण्यात येणार आहे. दोन कालावधीमध्ये मिळून १०० नागरिकांशी चर्चा करणार आहे. अशा ४४० x १०० = ५४० नागरिकांशी चर्चा करण्यात येणार आहे व माहिती संकलीत करण्यात येणार आहे.

द्वितीय स्त्रोत :

द्वितीय स्त्रोतातंर्गत संदर्भग्रंथ, पुस्तके, शोधपत्रिका, नियतकालिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, इंटरनेट संकेतस्थळे, मासिके, पूर्व संशोधित साहित्य, गॅजेट इत्यादी स्त्रोताचा उपयोग करून माहिती संकलीत केली जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :

''लोकशाही प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे विकासातील योगदान : विशेष संदर्भ जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्य (सन २००४ ते २०१४)'' या विषयासंबंधी विचार केला तर जालना जिल्ह्यातील विधानसभेचा कालावधी फार मोठा आहे. त्यामुळे या विषयाला योग्य व परिपूर्ण न्याय देता यावा यासाठी या अभ्यासविषयाचा कालावधी २००४ ते २०१४ हा निवडला आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातील घनसावंगी, परतूर, बदनापूर, जालना, भोकरदन या पाच विधानसभा मतदार संघामध्ये विधानसभा सदस्याने केलेल्या कार्यांचा अभ्यास केला जाणार आहे. २००४ ते २०१४ या कालावधीतील विधानसभा सदस्यांना प्राप्त झालेला विकास निधी त्यांनी कशा प्रकारे उपयोगात आणला व त्या

माध्यमातून विधानसभा मतदार संघामध्ये कोण–कोणती विकास कार्य केले याचा आढावा या संशोधन कार्यात घेतला जाणार आहे.

संशोधन विषयाची मर्यादा :

प्रस्तूत संशोधन कार्यास काही व्यक्ती, स्थळ व काळाच्या मर्यादा आहेत. प्रस्तूत संशोधन हे जालना जिल्ह्यातील विधानसभा सदस्यांच्या विकासात्मक कार्यावर आहे. त्या अंतर्गत केवळ विकासनिधीच्या माध्यमातून केलेल्या विकासात्मक कार्याचा अभ्यास केला गेला आहे. संशोधनाचा अधिकाधिक भर तथ्यांच्या प्राथमिक स्त्रोतांवर देण्यात आलेला आहे. आवश्यक तेथे द्वितीयक स्त्रोतांद्वारे देखील तथ्य संकलित करण्यात आली आहेत. तसेच केला गेलेला हा अभ्यास इ.स. २००४ ते २०१४ या कालावधीपुरताच केलेला आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तूत संशोधन कार्य हे पाच प्रकारांमध्ये विभागलेले आहे. ती पाच प्रकरणे पूढील प्रमाणे आहेत.

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना व संशोधन पद्धती
प्रकरण दुसरे	:	लोकशाही प्रक्रिया, संकल्पना आणि राजकीय नेतृत्वाचा उदय आणि विकास
प्रकरण तीसरे	:	जालना जिल्ह्यातील विधानसभा नेतृत्वाचे विकासातील योगदान आणि विधान सभेतील कार्य
प्रकरण चौथे	:	जालना विधानसभेतील सदस्यांचे विकासात्मक कार्य (सन २००४ ते २००९)
प्रकरण पाचवे	:	जालना विधानसभेतील सदस्यांचे विकासात्मक कार्य (सन २००९ ते २०१४)
प्रकरण सहावे	:	सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सूची :

१. आत्रे त्र्यं.ना. गावगाडा, ह.वि. मोटे प्रकाशन, वेस्ट व्ह्यू, दादर, मुंबई, तृतीय आवृत्ती, १९५९

२. आळेतकर प्रा.अ.स., प्राचीन भारतीय शासन पद्धती, प्रयाग भारती भांडार, लिडर प्रेस, १९५९

३. काळे भगवान, मनोगत, मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन जालना, १९८६

४. कुलकर्णी गो.म., निवड संविधानाचे, पृ. २१५

५. पाचोळे दा.धो., भारतीय समाज, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, जूलै २००४

६. खंडागळे जनार्दन काशीनाथ, बाळासाहेब विखे पाटील, ग्रामीन नेतृत्व : एक अभ्यास.

७. खेकाळे ना.श., राजकीय नेतृत्व, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९

८. गाडगीळ विठ्ठलराव, संसद मार्ग : लोकशाहीचा राजमार्ग, प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे, २००९

९. गायकवाड टि. एन., महाराष्ट्रातील स्थानिक प्रशासन, स्वप्नाली प्रकाशन, अहमदपूर, जून २००३

१०. गोळविलकर शिला, तळपुळे मालती, सामाजिक प्रभाव आणि नेतृत्व, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००४

११. चौधरी नारायण, आपटे अविनाश, ग्रामीण राजकारण आणि ग्रामीण संस्कृती, (सौ. २९२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

१२. दर्शनकार अर्जुनराव, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९२

१३. दर्शनकार अर्जुनराव, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, २०००

१४. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद, १९९९

१५. विचारशलाका (संपा.), कुंभार नागोराव, लोकशाही विशेषांक, जाने. – जून १९८८

वर्तमानपत्रे :

१. दैनिक लोकमत,

२. दैनिक सकाळ,

३. दैनिक गावकरी,

४. दैनिक सामना,

५. महाराष्ट्र टाईम्स,
६. लोकसत्ता,
७. पूण्यनगरी,
८. देशोन्नती,
९. सांजवार्ता.

मासिके :

१. लोकराज्य,
२. योजना,
३. कुरूक्षेत्र

संशोधक
सचिन सुधाकरराव शेवतेकर
एम.ए. (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक
डॉ. शरद कुलकर्णी
प्राचार्य विभागप्रमुख,
राज्यशास्त्र विभाग, नुतन
महाविद्यालय, सेलू, जि. परभणी